**ठळक बातम्या**

- विमान कंपन्यांना इंधन दरवाढीपासून दिलासा देण्यासाठी १० हजार कोटींच्या निधीला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
- नवी दिल्लीत रेस्टॉरन्टला लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू, ४० जण जखमी
- डी. के. शिवकुमार यांनी घेतली कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ
- पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षात फूट

**आणि**

- इराणी फौजांनी कुवेतच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या हल्ल्यात एका भारतीयाचा मृत्यू

**<><><><><>**

विमान कंपन्यांना इंधन दरवाढीपासून दिलासा देण्यासाठी दहा हजार कोटींच्या स्थिरीकरण निधीला मंजुरी देण्याचा निर्णय आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला. हा फिरता निधी असून यामुळे इंधनाचे दर स्थिर ठेवायला मदत होईल, विमान वाहतूक परिसंस्थेवर अवलंबून ७७ लाख नोकऱ्यांना यामुळे संरक्षण मिळेल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**होल्ड बाईट वैष्णव**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विमान इंधनाचे दर मे महिन्यात अडीच पटीने वाढून १४२ रुपये प्रति लिटर इतके झाले आहेत. या निर्णयानुसार इंधनाचे दर स्थिर राहावे यासाठी तेल विपणन कंपन्यांना दहा हजार कोटी रुपये बिनव्याजी दिले जाणार आहेत.

याशिवाय नवी दिल्लीतल्या जुन्या बस आणि ट्रक बदलण्यासाठी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र नियोजन मंडळाला सहाय्य करण्यासाठीच्या योजनेलाही आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याची अंमलबजावणी दिल्ली, हरियाणा, उत्तरप्रदेश आणि राजस्थान या राज्यांच्या सहकार्याने केली जाईल. दिल्ली राजधानी क्षेत्रातलं प्रदूषण कमी करणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

रामेश्वर ते पारादीप या १६३ किलोमीटरच्या सागरी किनारी मार्गालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याला आठ हजार तिनशे कोटी खर्च येईल असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नवाचार मंत्र या मोहिमेची सुरुवात कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्ली इथं झाली. देशभरात तळागाळातल्या नवोन्मेषकांना शोधणं, त्यांना मार्गदर्शन करणं आणि त्यांच्या व्यवासायाचा विस्तार करण्यास मदत करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. या नवोन्मेषकांना उद्योगपती, तज्ञ, गुंतवणूकदार यांच्याशी जोडणं यामुळे शक्य होणार आहे. यासाठी स्किल इंडिया डिजिटल हबवर नोंदणी सुरू झाली असून नवोन्मेषकांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी असं आवाहन चौधरी यांनी केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत नेपाळच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष रवी लामिछाने यांची भेट घेतली. नेबरहुड फर्स्ट या भारताच्या धोरणांतर्गत नेपाळ हा एक महत्त्वाचा घटक असल्याचं मोदी या भेटीनंतर समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले. दोन्ही देशांमधल्या विशेष आणि बहुआयामी संबंधांना अधिक उंचीवर नेण्यासाठी भारत नवीन सरकारसोबत सहकार्य करण्यास उत्सुक असल्याचंही मोदी म्हणाले.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या मालवीय नगर इथल्या एका रेस्टॉरन्टला लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमधे बहुतांश आफ्रिका आणि मध्य आशियातल्या नागरिकांचा समावेश आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

<><><><><>

काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते डी. के. शिवकुमार यांनी आज बंगळुरू इथे झालेल्या सोहळ्यात कर्नाटकचे २५ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. तर डॉक्टर जी. परमेश्वर यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या दोघांसह के. एच. मनियाप्पा, के. जे. जॉर्ज, एम. बी. पाटील, रामलिंग रेड्डी, सतीश जारकीहोळी आदी १४ आमदारांना राज्यपाल थावरचंद यांनी गेहलोत मंत्रीपदाची शपथ दिली.

या सोहळ्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, के. सी. वेणुगोपाल उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डी. के. शिवकुमार यांचं मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे अभिनंदन केलं आहे. केंद्र सरकार कर्नाटक सरकारसोबत मिळून काम करेल असं ते म्हणाले.

<><><><><>

तृणमूल काँग्रेसच्या पश्चिम बंगाल विधीमंडळ पक्षात आज २८ वर्षात पहिल्यांदा फूट पडली. पक्षाच्या एकूण ८० पैकी ५८ आमदारांच्या गटानं स्वतःला खरा तृणमूल काँग्रेस असं जाहीर केलं आणि या आमदारांचा पाठिंबा असलेल्या रिताब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्ष नेतेपदी निवड झाल्याचं पश्चिम बंगाल विधानसभेच्या अध्यक्षांनी जाहीर केलं. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि माजी

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यापूर्वीच रिताब्रत यांना यापूर्वीच पक्षातून काढून टाकलं आहे. तरी, या गटाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून ममता बॅनर्जी यांनी काम करावं असं आवाहन रिताब्रत बॅनर्जी यांनी केलं आहे. राज्याबाहेर असलेल्या आणखी २ आमदारांचा पाठिंबा या गटाला असल्याचा दावा रिताब्रत यांनी केला आहे.

शोभादेव चट्टोपाध्याय यांची विरोधी पक्षनेते पदी निवड करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधातून या बंडाला सुरुवात झाली.

**<><><><><>**

इराणी फौजांनी आज कुवेतच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासी टर्मिनलवर केलेल्या हल्ल्यात एका भारतीयाचा मृत्यू झाला आणि ६३ जण जखमी झाले. या हल्ल्यामुळं या विमानतळावरच्या विमान वाहतुकीवर परिणाम झाला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्डनं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. त्यांनी कुवेत आणि बहारीनमध्ये विविध ठिकाणी क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे हल्ले केले.

भारतीय नागरिकाच्या मृत्यूबद्दल परराष्ट्र मंत्रालय आणि कुवेतमधल्या दुतावासानं निषेध व्यक्त केला आहे. मृत नागरिकाच्या आणि जखमींच्या मदतीसाठी दुतावास कुवेत प्रशासनासोबत संपर्कात आहे, असं दुतावासाने समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानू यांच्याविषयी अपशब्द उच्चारल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्याचवेळी नेत्यानू यांच्यासोबतचे संबंध मजबूत असून त्यांच्याशी अजूनही संपर्कात असल्याचं ट्रम्प म्हणाले. इराणसोबत शस्त्रसंधीच्या मुद्द्यावरुन सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी अपशब्द उच्चारले होते.

इराणचे सर्वोच्च नेते मोजताबा खोमेनई यांच्यासोबत शस्त्रसंधीची चर्चा सुरू आहे. तरी हे युद्ध कधी संपेल किंवा होर्मुझची सामुद्रधुनी कधी खुली होईल, यावर निश्चित तारीख सांगायला ट्रम्प यांनी नकार दिला. कदाचित सप्टेंबरपर्यंत ही सामुद्रधुनी बंद राहील, अशी शक्यता त्यांनी वर्तवली.

<><><><><>

राज्य सरकार आणि प्रसार भारती मुंबईत ‘एकात्मिक चित्रपट आणि दूरदर्शन मीडिया हब’ स्थापन करणार आहे. मालाड इथल्या प्रसार भारतीच्या एकूण २७८ एकर जागेपैकी सुमारे १५०एकर क्षेत्रावर चित्रपट नगरीसोबत हा संयुक्त विकास प्रस्तावित आहे. यासाठी विशेष कंपनी स्थापन करायला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मान्यता दिली. या प्रस्तावित मीडिया हबमध्ये अत्याधुनिक चित्रपट स्टुडिओ, आंतरराष्ट्रीय दर्जाचे फिल्म आणि संगीत प्रशिक्षण केंद्र यासह माहिती तंत्रज्ञान आणि इतर सुविधा उपलब्ध असतील.

<><><><><>

व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्रपती डेल्सी एलोइना रॉड्रिग्ज गोमेझ यांचं आज नवी दिल्लीत आगमन झालं. त्या ५ दिवसांच्या भारतभेटीवर आल्या आहेत.

<><><><><>

देशातल्या सोन्याचा साठा कमी झाल्याचं वृत्त रिझर्व्ह बँकेनं फेटाळून लावलं आहे. सध्या देशात ८८० टनांहून अधिक सोन्याचा साठा आहे, असं बँकेनं स्पष्ट केलंय. देशाच्या परकीय चलन साठ्यातलं सोन्याचं प्रमाण सप्टेंबर २०२५ मधल्या सुमारे १४ टक्क्यांवरुन वाढून सुमारे १७ टक्क्यांपर्यंत पोहोचलं आहे. रिझर्व्ह बँकेनं सुमारे १२ अब्ज अमेरिकन डॉलर रकमेचं सोनं विकल्याचं वृत्त काही खासगी माध्यमांनी दिलं होतं. त्यावर रिझर्व्ह बँक आणि पीआयबीनं हे स्पष्टीकरण दिलं आहे.

<><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंकाला पराभवाचा धक्का बसला. डायाना श्नायडरनं तिच्यावर ३-६, ७-५, ६-० अशी मात केली. पहिला सेट ६-३नं जिंकून घेतलेली आघाडी टिकवून ठेवण्यात अरीनाला अपयश आलं. तिसऱ्या सेटमध्ये अरीनाला एकही गेम जिंकता आला नाही आणि डायानानं निर्विवाद वर्चस्व गाजवत सामना आपल्या नावावर केला. याआधीच्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात माया व्हालिन्स्का हिनं ॲना कालिन्स्काया हिच्यावर ७-६, ६-३ असं हरवलं.

**<><><><><>**

येत्या काही आठवड्यात भारत-अमेरिका व्यापार करारावर स्वाक्षरी होईल, असा विश्वास अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जिओ गोर यांनी व्यक्त केला आहे. करारातल्या १ टक्के मुद्द्यांवर सहमती शिल्लक आहे आणि त्यावर चर्चा सुरू असल्याचं ते मुंबईत एका परिषदेत म्हणाले.

अतिरीक्त आयात शुल्क लादल्याप्रकरणी अमेरिकेसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्रालयानं दिली आहे. त्यासोबतच द्विपक्षीय व्यापार करार अंतिम करण्यासंदर्भातही बोलणी सुरू असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**